Maya CARE Foundation
The next best thing to family

# माया केअर फाऊंडेशन

News Letter

✻ वार्तापत्र ✻

वर्ष : 4 रे • अंक : 1 ला
ऑक्टोबर – डिसेंबर 2024
केवळ खाजगी वितरणासाठी विनामूल्य

# संपादकीय ...

सन २०२४ च्या शेवटच्या तिमाहीत आपण प्रवेश केला आहे.आज २ ऑक्टोबर महात्मा गांधी यांची जयंती त्यानिमित्त या महामानवाला विनम्र अभिवादन. महाराष्ट्र राज्याची ज्येष्ठ नागरिकांची अंदाजे संख्या १ कोटी इतकी आहे. कुटुंबात मिळणाऱ्या सोयी सुविधा, आधुनिक उपचार पध्दती, वैद्यकीय सुविधा, राहणीमान, सकस आहार व आरोग्याविषयी जागृती निर्माण झाल्यामूळे आयुर्मानात वाढ होत आहे. समाजामध्ये शिक्षणाचे प्रमाण वाढल्याने व रोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्यामुळे तरुण वर्ग व्यवसाय, नोकरी निमित्ताने ग्रामीण भागातून शहराकडे व एका शहरातून दुसऱ्या शहराकडे स्थलांतरीत होत आहे. स्थलांतराच्या वाढत्या प्रमाणाबरोबरच विभक्त कुटूंब पध्दती रुढ होत आहे. छोटे कुटुंब, राहण्यासाठी छोटी जागा, इत्यादी कारणामुळे ज्येष्ठ नागरिकांच्या समस्यांमध्ये वाढ होत आहे. आर्थिक दुर्बलता, कमी वेतन, वाढती महागाई, यामुळ सुध्दा कौटुंबिक समस्यांमध्ये वाढ होत असून त्याचा अप्रत्यक्ष परिणाम ज्येष्ठ नागरिकांच्या पोषण व आरोग्यावर होत आहे. ज्येष्ठ नागरिक हा समाजाचा महत्वपूर्ण घटक असल्याने, ज्येष्ठ नागरिकांचे राहणीमान सुसह्य व्हावे, आरोग्याच्या सोयी सुविधा उपलब्ध व्हाव्यात, त्यांच्या पालन पोषणाची जबाबदारी व ज्येष्ठ नागरिकांचे अधिकार यांची जाणीव समाजाला आणि त्यांच्या पाल्यांना होणे आवश्यक आहे. याबाबत केंद्र शासनाने ज्येष्ठ नागरिकांच्या कल्याणासाठी, आयुष्यमान भारत प्रधान मंत्री योजना याची व्याप्ती वाढवून त्यानुसार ७० वर्षापेक्षा जास्त वयोगटातील जेष्ठ नागरिकांना मोफत आरोग्य योजना जाहीर केली आहे . यापूर्वी ही योजना होती पण ती फक्त कमी उत्पन्न गटातील लोकांसाठी होती आता ज्यांचे वय ७० वर्षे पूर्ण झाले आहे , अशा सर्वांना लागू करण्यात आलेली आहे. याबद्दल केंद्र सरकारचे आभार मानावेत तेवढे थोडेच आहेत. आजपर्यंत ज्या ज्या योजना केंद्र सरकारने तसेच राज्य सरकारने राबविल्या त्या एकतर कमी उत्पन्न गटातील किंवा अनुसूचित जाती जमातींसाठी होत्या . मध्यमवर्गीय लोकांसाठी व तथाकथित उच्च वर्गीयांसाठी कोणतीही सरकारी योजना नव्हती.परंतु ही योजना ज्यांनी ७० वर्षे पूर्ण केली आहेत त्या सर्वांना लागू आहे. दिनांक २० सप्टेंबर रोजी भारत सरकारच्या राष्ट्रीय स्वास्थ्य प्राधिकरण कार्यालयाने काढलेले परिपत्रकांचे मराठी भाषांतर या अंकात दिले आहे. आणि भारत सरकारने जेष्ठ नागरिकांच्या आरोग्यासाठीच हे टाकलेले पाऊल खूप क्रांतिकारक आहे.

या तिमाहीत आम्ही आमच्या उपक्रमामध्ये मोठ्या गतीने काम सुरु केले आहे. पुण्यातील दीनानाथ मंगेशकर हॉस्पिटल मध्ये आम्ही वर्षापूर्वी May I Help You चे कौंटर काढले असून आम्ही रुग्णालयात येणाऱ्या रुग्णांना व त्यांच्या नातेवाईकांना सेवा देत असतोच पण सेवेचा हा विस्तार आम्ही वाढविला असून आता सेंटर पॉइंट हॉस्पिटल नागपूर ,ताराचंद हॉस्पिटल मुंबई , कल्याण डोंबिवली महानगरपालिका शास्त्रीनगर सामान्य रुग्णालय मुंबई,जनरल हॉस्पिटल के आर पुरम बंगलोर आणि सरदार वल्लभभाई पटेल हॉस्पिटल नवी दिल्ली येथेही या सेवा सुरु केल्या आहेत. या सेवांसाठी रुग्ण आणि नातेवाईक यांचेकडून खूप मोठा प्रतिसाद मिळत आहे विशेषतः सरदार वल्लभभाई पटेल हॉस्पिटल नवी दिल्ली या ठिकाणी रोज सरासरी २५ रुग्णांना आम्ही सेवा देत आहोत.

एन आर आय पेरेंट असोसिएशन , म्हणजे ज्यांची मुले परदेशात असतात त्यांच्या आईवडिलांची एक संघटना पुण्यात आहे . ही संघटना मुख्यत्वे करून जी मुले परदेशी शिक्षणासाठी, किंवा नोकऱ्यांसाठी जातात, त्यांना वैद्यकीय मदत, प्रवासासाठी मार्गदर्शन, व्हिसा/पासपोर्ट यांचे नियम समजावून देणे, परदेशातील वास्तव्यात वैद्यकीय विमा इत्यादी बाबतीत मदत करीत असते . तसेच या संस्थेचे संस्थापक माजी न्यायमूर्ती कै. एल . एन. अभ्यंकर यांच्या स्मरणार्थ, ज्या सामाजिक संस्था निस्वार्थपणे समाजासाठी काम करीत असतात अशा संस्थांपैकी एका संस्थेचा गौरव ते दरवर्षी करीत असतात .

यावर्षी एन आर आय पेरेंट असोसिएशने माया केअर फाउंडेशन ही संस्था निवडली आणि याचे डायरेक्टर डॉ. सुरेश गोखले यांचा गौरव समारंभ भारतीय अंतरिक्ष अनुसंधान संस्थेचे डायरेक्टर (ISRO ) डॉ. प्रमोद काळे यांच्या हस्ते शाल, श्रीफळ आणि मानपत्र देऊन करण्यात आला. सदरच्या मानपत्रात डॉक्टरांच्या वैद्यकीय व्यवसायातील योगदानाचा उल्लेख तर आहेच, पण वृद्धांसाठी आणि दिव्यांगांसाठी संपूर्णपणे मोफत काम करणारी जगातील एकमेव संस्था म्हणून माया केअर या संस्थेचा व संस्थेचे संस्थापक म्हणून डॉक्टर गोखले व कुटुंबीयांचा उल्लेख करण्यात आला आहे .

सत्काराला उत्तर देताना डॉ. गोखले यांनी माया केअरची माहिती तर दिलीच पण आपले स्वयंसेवक किती अभिनव पद्धतीने, समर्पित वृत्तीने वृद्धांना कशी मदत करतात याचे सुद्धा सविस्तर वर्णन केले . यावेळी स्वयंसेवकांचे प्रतिनिधी म्हणून श्री विद्याधर जोशी आणि श्री मकरंद निमोणकर कार्यक्रमाला उपस्थित होते .

# लाभार्थ्यांच्या प्रतिक्रिया

१) हेमंतजींना भेटून अम्माला खूप आनंद झाला. तिला खूप मजा आली. ती त्यांच्या पुढच्या भेटीची वाट पाहत आहे. त्याच्या पाठिंब्याबद्दल मी आभारी आहे.–

***

सुधा मेनन. पुणे ९८२३०३५८६९.

२) आज रामकृष्ण वाणी यांनी माझ्या ठिकाणी भेट देऊन मला काही सामान आणण्यास मदत केली आणि माझ्या कामातही मला मदत केली. त्याची सेवा चांगली उपयुक्त आहे. –

श्रीनिवास देव पुणे ९५७९३९५४८२

***

२८।६।२०२४

॥ जय श्रीराम ॥

नमस्कार.

माझे नाव – मेघना जगदीश जोशी. मी आत्ता रामबाग कॉलनी, उमा-महेश सोसायटी, मध्ये रहाते. माझे मिस्टर श्री. जगदीश. शं. जोशी. हे १९ सालात रस्त्यात पडले. त्यांच्या मेंदुला थोडी इजा झाली. वेगवेगळ्या आजारांमुळे ते अंथरुणावर खिळून राहिले. त्यांना चालता येत नव्हत. पायात ताकद नव्हती आम्ही दोघेच घरी रहात होतो. आमचा मुलगा १४ वर्षांपूर्वी कार ॲक्सीडेंट मध्ये गेला. आम्ही दोघे खूपच खचुन गेलो होतो. माझे मिस्टर तेव्हापासुन खुपच खचले होते. त्यात ते १९ सालात बाहेर फिरायला गेले तेव्हा पडले. त्यांना थोडे लागले. त्या पडल्याने त्यांना मेंदूला पण थोडी इजा झाली. हळू हळू त्यांना विस्मरण व्हायला लागले. मग मलाच सगळी कामे करावी लागत होती. त्यावेळी मी कुलुप लावून बाहेरील कामासाठी जात होते. पण असं त्यांना एकट सोडून जाणं सुध्दा धोकादायक होत. मी खुप काळजीत होते. मी माझ्या मैत्रीणीला ही गोष्ट बोलले. तीला 'माया केअर फौंडेशन' बद्दल माहीती होती. तिने मला सांगीतले की ह्या संस्थेतील काही लोक तुला ह्यासाठी नक्कीच मदत करतील मग मी संस्थेचे काम करणाऱ्या माधुरीताई यांना फोन केला त्यांनी श्री. ढोरे काकांचा नंबर दिला ते चांगल गाईड करतील म्हणुन मी त्यांना फोन केला. ढोरे काका सगळ्यात पहिले माझ्याकडे आले. त्यांना फोनवर माझ्या मिस्टरांबद्दल जुजबी माहीती दिली. ते यायला तयार झाले. ते येण्याआधी माझ्या मनात थोडी धाकधुक होती. की हे सगळ कसं काय मॅनेज होईल. परक्या व्यक्तीला आपल्या कडे बोलवायच आणि विस्मरणात जाणाऱ्या माझ्या मिस्टरांना त्यांच्यावर सोपवून बाहेर जायच ह्या गोष्टीची थोडी चिंता होती. कारण आपण समाजात चाललेल्या अनेक गोष्टी ऐकतो, वाचत असतो. म्हणुन भिती होती. पण ही भिती प्रथम भेटीत श्री ढोरे काकांना भेटुनच त्यांच्याशी बोलून नाहीशी झाली. त्यांनी त्यांचे संस्थेच काम कुठे, कसं आणि काय चालते याची सविस्तर माहीती दिली. मग मी आठवड्यातून एकदा त्यांना बोलावून बाहेर जाऊ लागले. मी पहिल्यांदा बाहेर जाऊन घरी आले तेव्हा माझे मिस्टर खुप खुश व आनंदी दिसले. ढोरे काकांनी त्यांच्याशी वेगवेगळ्या विषयावर गप्पा मारल्या पत्ते खेळले. ह्या सगळ्यात दीड तास कसा गेला हे समजलच नाही. ढोरे काकांचा सहवास मिस्टरांना आवडू लागला ते त्यांची वाट पहात असत. काकांनी मला सांगीतले परवाच्या वेळेस मला जमलं नाही तर आमच्या कडील इतरही लोक तुमच्याकडे येऊ शकतील. मलापण ते सोयीचे होत मग त्यांनी मला श्री विनोद दफ्तरदार, श्री. विद्याधर जोशी यांचे नंबर दिले. ते दोघेही नंतर यायला लागले. दफ्तरदार काका एवढ्या वयाचे असुन अतिशय उत्साही, सर्वेला तत्पुर होते. त्यांचे कडुन इतरही खुप माझ्या मिस्टरांना मिळाली. व श्री जोशी अतिशय शांत सुस्वभावी आहे. त्यांना फोन केला की ते नक्की येतो म्हणत असत. ह्या तिघांना मी माझ्या घरी येण्याचे जे टायमींग देत होते. बरोबर त्याच वेळेस किंवा ५ ते १० मिनीट आधीच ते येत होते. कधीही माझी गैरसोय केली नाही. ह्या तिघांचे सहकार्य मला खुप खुप लागले. ह्या तिघांबद्दल जिव्हाळा, प्रेम आपलेपणा निर्माण झाला. आणि 'माया फाऊंडेशन' च्या कडून माया पण मिळाली. हे तिघेही माझे मोठे भाऊच आहेत. व माझ्या मिस्टरांचे चांगले मित्रपण झाले. त्या तिघांनी अत्यंत प्रेमाने, निःस्वार्थी पणाने, निशुल्क सेवा दिली. त्यांची व माया केअर ची कायम ऋणी राहीन. माझ्या मिस्टरांचे १७ मे २०२४ रोजी निधन झाले. माझे तिघेही भाऊ मला भेटून धीर देऊन गेले. अशी देवासारखी माणसं मला 'माया केअर' मधुन मिळाली. म्हणुन मी संस्थेची आभारी आहे. अशा प्रकार निस्वार्थी काम करणाऱ्यांची समाजाला खुप गरज आहे. मी आता आपल्या संस्थेचे नाव गरजु लोकांना सुचवु शकते. मला संस्थेच्या कामाचा विश्वास वाटतो. त्यांचे कडे जे व्हॉलेंटीयर आहेत. तेही उत्तम सेवा देतात यातच संस्थेचे नाव लौकीक होते. या संस्थेची व ह्या तिघांची मी आयुभर ऋणी राहीन.

आ.

मेघना जोशी.

# माया केअर वृत्त

१. दिनांक ४ जुलै २०२४ रोजी 'सन सिटी रोड ज्येष्ठ नागरिक संघ',आनंद नगर,सिंहगड रोड, पुणे ५१ येथे माया केअर स्वयंसेवक श्री मकरंद निमोणकर आणि स्वाती फापाळे यांनी उपस्थितांना 'माया केअर' संस्थेची कार्यपद्धती आणि वरिष्ठ नागरिकांना पुरवण्यात येणारी सेवा याबद्दल माहिती सांगितली. उपस्थितांनी याबाबत समाधान व्यक्त केले.

२. दिनांक १८ जुलै२०२४ रोजी पिंपरी चिंचवड(PCMC) एरियातील स्वयंसेवकांना, श्रीधरनगर चिंचवड येथे, माया केअर चे सिनिअर स्वयंसेवक श्री.मकरंद निमोणकर यांनी 'माया केअर' संस्थेचे काम स्वयंसेवकानी कसे करावे व इतर कार्यपद्धती याबद्दल मार्गदर्शन केले. उपस्थित ज्येष्ठ नागरिकांना माया केअर माहिती पत्रकाचे वितरण केले.

३. दिनांक १५ ऑगस्ट २०२४ रोजी माया केअर स्वयंसेवक श्री. नंदू नारंग यांच्या हस्ते विद्या भवन हायस्कूल, शिवाजीनगर, पुणे येथे ध्वजारोहण कार्यक्रम संपन्न झाला.

५. दिनांक १५ ऑगस्ट २०२४ रोजी माया केअर सेवा देत असलेल्या भारतातील २७ शहरातील वृद्धाश्रमांमध्ये ज्येष्ठ नागरिकांसोबत स्वातंत्र्य दिन साजरा करण्यात आला.

६. १६ ऑगस्ट २०२४ रोजी 'माया केअर फाउंडेशन मानवतेचे मंदिर' हा लेख मुंबई सकाळ मध्ये प्रसिद्ध झाला.

७. दिनांक १९ ऑगस्ट २०२४ रोजी रक्षाबंधना निमित्त माया केअर सेवा देत असलेल्या भारतातील २६ शहरातील वृद्धाश्रमांमध्ये ज्येष्ठ नागरिकांना राखी बांधून रक्षाबंधन सण साजरा करण्यात आला.

९. सप्टेंबर २०२४ मध्ये माया केअर चे सिनिअर स्वयंसेवक श्री. अनिल नातू यांनी (अमेरिकेत मुलाकडे गेले असताना) 'Baltimore महाराष्ट्र मंडळ' (USA) येथे अनेकांना माया केअर करीत असलेल्या कार्याबद्दल माहिती सांगितली.सर्वांनी त्याचे कौतुक केले व काही जणांनी देणगी दिली.

१०. दिनांक २१ सप्टेंबर २०२४ रोजी गणेश कला क्रीडा मंच ऑडिटोरियम मध्ये 'नवचैतन्य हास्ययोग परिवार' यांचा वर्धापन दिन होता .त्यावेळी माया केअर स्वयंसेवक श्री गजानन ढोरे व स्वयंसेविका विनिता महाजन यांनी 'माया केअर' ची माहिती पत्रके वाटली.

---

## आयुष्यमान भारत प्रधान मंत्री जन आरोग्य योजना (परिपत्रक २० सप्टेंबर २०२४)

**या योजनेची वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे आहेत**

१) ही योजना ७० वर्षावरील सर्व ज्येष्ठ नागरिकांना आता उपलब्ध होईल यासाठी तो ज्येष्ठ नागरिक कोणत्याही समाजाचा असेल तसेच कितीही वार्षिक उत्पन्न असेल तरीही त्याला या योजनेचे फायदे घेता येतील . यापूर्वी या योजनेच्या अटीत बसत असलेले ७० वर्षावरील ज्येष्ठ नागरिक तसेच या योजनेच्या अटीत न बसणारे नागरिक या सर्वाना हि योजना लागू होईल .

२) या योजनेसाठी पात्रतेसाठीचा एकमेव निकष म्हणजे त्या जेष्ठ नागरिकाने वयाची ७० वर्षे पूर्ण केली असली पाहिजेत . वयाच्या निकषात तो जेष्ठ नागरिक बसतो कि नाही यासाठी आधार कार्डावरील जन्मतारीख ही ग्राह्य धरली जाईल या योजनेत नोंदणी करण्यासाठी आधार कार्ड आधारित e-kyc वर आधारित असेल आणि आधार कार्ड धारकांनाच या योजनेचे कार्ड मिळेल.

३) जे लाभधारक इतर केंद्र सरकारी किंवा राज्य सरकारी योजने अंतर्गत आरोग्य विम्याच्या अंतर्गत लाभ घेत असतील तर त्यांना या योजनेखाली लाभ घ्यावयाचा आहे कि त्यांना पूर्वीच्या योजनेनुसार लाभ घ्यायचा आहे हे निवडण्याची एकदा संधी दिली जाईल . दोन्हीपैकी एकच योजनेचा लाभ घेता येईल .

४) ज्या ज्येष्ठ नागरिकांनी खाजगी विमा कंपनीकडून आरोग्य विमा उतरविलेला आहे किंवा एम्प्लॉईज स्टेट इन्शुरन्स पॉलिसी खाली ज्यांना विम्याचे संरक्षण आहे अशा ७० वर्षावरील ज्येष्ठ नागरिकांना सुद्धा या योजनेत भाग घेऊन त्याचे लाभ घेता येतील.

५) यापूर्वी जे ज्येष्ठ नागरिक आयुष्मान भारत प्रधान मंत्री जन आरोग्य योजनेत सभासद असतील आणि अशा कुटुंबातील एखाद्या सदस्याने जर ५ लाख किंवा कमी रकमेचा लाभ घेतला असेल, तरीही जेष्ठ नागरिकांना या योजने अंतर्गत अधिक ५ लाखाचे (Top -UP) संरक्षण मिळेल . जर या योजनेतील एळाद्या ज्येष्ठ नागरिकाने या योजनेअंतर्गत ५ लाख किंवा कमी रकमेचा लाभ घेतला असेल तरीही अशा ज्येष्ठ नागरिकांच्या कुटुंबियांसाठी हे पाच लाखाचे अधिकचे हे (Top -UP ) कव्हर मिळू शकेल .

६) या योजनेचा लाभ घेणेसाठी सर्व पात्र ज्येष्ठ नागरिकांनी अर्ज करणे आवश्यक आहे.


७) या योजनेची नोंदणी हि सतत वर्षभर सुरु राहील.

८) मोबाईल फोन वर स्वतंत्र मोड्युल तयार करण्यात आलेले असून ( आयुष्यमान ॲप) आणि वेब पोर्टल वर beneficiary.nha.gov.in असे तयार करण्यात आलेले असून ज्यांना या योजनेचा लाभ घ्यायचा आहे त्यांनी या ॲप वर किंवा पोर्टल वर जाऊन नोंदणी करावी

९) सध्या लाभ घेत असलेल्या ज्येष्ठ नागरिंकना व नवीन नोंदणी करणाऱ्या ज्येष्ठ नागरिकांना आयुष्यमान कार्ड मिळेल.

– संकलक श्री विद्याधर जोशी.

# मानपत्र



नॉन रेसिडेंट इंडियन्स पेरेंट्स ऑर्गनायझेशन
न्यायमूर्ती कै. ना. ल. अभ्यंकर पुरस्कार २०२४-२५

न्यायमूर्ती
कै. ना. ल. अभ्यंकर

मानपत्र
डॉ. सुरेश गोखले
संस्थापक, माया केअर फाऊंडेशन

डॉ. सुरेश गोखले

अनिवासी भारतीय मुलांच्या पालकांच्या, 'नृपो' (NRIPO) संस्थेचे संस्थापक अध्यक्ष न्यायमूर्ती कै. ना. ल. अभ्यंकर यांच्या स्मरणार्थ दरवर्षी सामाजिक जाणिवेतून वृध्दांसाठी निष्ठापूर्वक काम करणाऱ्या समाजव्रती व्यक्तीस पुरस्कार दिला जातो. २०२४-२५ या वर्षासाठी 'माया केअर फाऊंडेशन' चे संस्थापक डॉ. सुरेश गोखले यांना या पुरस्कारचे मानकरी म्हणून सन्मानित करताना आम्हाला विशेष आनंद होत आहे.

आपण MBBS, DCH आणि क्रीडा मानसशास्त्रज्ञ म्हणून गेली ५० पेक्षा अधिक वर्षे कार्यरत आहात. सन २००९ मध्ये आपण 'माया केअर फाऊंडेशन'ची स्थापना केली आणि तिच्या अभ्युदयार्थ स्वतःस समर्पित केले आहे.

आपली ही संस्था विविध पातळ्यांवर विशिष्ट ध्येयाने प्रेरित होऊन काम करत आहे. वृद्ध तसेच विकलांग व्यक्तींना सर्व प्रकारच्या लहानमोठ्या गरजांसाठी विनामूल्य सहाय्य करणे, वृद्ध जनांना क्षमतेप्रमाणे काम पुरविणे, विकलांग व्यक्तींना त्यांच्या दुर्बलतेवर मात करण्यास मदत करणे आणि अशा अपंगत्वावर विजय मिळवलेल्यांना 'माया केअर फाउंडेशन' ही संस्था व्यावसायिक दृष्टिकोनातून पुढे नेण्यासाठी तयार करणे. ही संख्या आता १५० वर पोहोचली आहे.

'माया केअर फाउंडेशन' ही वृद्ध आणि दुर्बलतेवर मात केलेल्या व्यावसायिकांनी चालविलेली एकमेव आगळी वेगळी संस्था आहे. भारतातील ७४ आणि यू के मधील ४ शहरात आपले २००० स्वयंसेवक कार्यरत आहेत आणि त्यांनी ३१,५४२ गरजू लोकांना भेट दिली आहे. या महान कार्यासाठी आपणास जीवनगौरव पुरस्काराने व 'माया केअर फाउंडेशन' ला विविध पुरस्कारांनी गौरविण्यात आले आहे. जवळजवळ १४ वर्षे या संस्थेचे कार्य अव्याहतपणे चालू आहे आणि या सेवायज्ञाचे अध्वर्यू डॉक्टर साहेब आपण आहात.

समाजकार्य म्हणून गेल्या २२ वर्षांपासून आपण मानद बालरोगतज्ञ म्हणून प्रत्येक महिन्याला पुणे येथील पोलिस क्लिनिकच्या १०० मुलांची विनामूल्य तपासणी वयाच्या ८१ व्या वर्षीही करत आहात. ज्येष्ठ नागरिक आणि अपंगजनांचे तर आपण आधारवडच आहात.

आपल्या व्यापक ध्येयपूर्तीच्या उत्तरोत्तर यश प्राप्तीसाठी परमेश्वर आपणास उदंड व निरामय आयुष्य देवो ही प्रार्थना. आपल्या उर्वरीत वाटचालीसाठी नृपोच्या हार्दिक शुभेच्छांची शिदोरी म्हणून २०२४-२५ चा न्यायमूर्ती कै. ना. ल. अभ्यंकर पुरस्कार आज शनिवार, दिनांक २७ जुलै २०२४ रोजी आपणास प्रदान करण्यात येत आहे.

दिनांक : २७ जुलै २०२४
स्थळ : पुणे

अध्यक्ष आणि कार्यकारी समितीचे सर्व सदस्य
नॉन रेसिडेंट इंडियन्स पेरेंट्स ऑर्गनायझेशन

**एन. आर. आय पेरेंट ऑर्गनायझेशन**

**(NRIPO)**

**यांनी डॉ. सुरेश गोखले**

**माया केअर फाऊंडेशन**

**यांना दिलेले मानपत्र.**



एन आर आय पेरेंट असोसिएशन ने केलेल्या सत्कार समारंभच्या वेळी इसरो चे डायरेक्टर डॉक्टर प्रमोद काळे यांच्यासमवेत डॉक्टर सुरेश गोखले श्री मकरंद निमोणकर व विद्याधर जोशी.

# श्रध्दांजली

**गेल्या तिमाहीत पुणे येथील  खालील लाभार्थी ज्येष्ठ नागरिकांचे निधन झाले. त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली.**

**तेजस्विनी गाडगीळ**
(लाभार्थी पुणे) निधन २९ जुलै २०२४

**संध्या भावे**
(लाभार्थी पुणे)
निधन ३ ऑगस्ट २०२४

**रामदासजी कामडी**
(बिंदू सदस्य नागपूर)
१५ सप्टेंबर २०२४

**श्रीकृष्ण खेर**
(लाभार्थी पुणे)
निधन २७ ऑगस्ट २०२४.

**माधुरी चरकारी**
(बिंदू सदस्य ठाणे)
२४ सप्टेंबर २०२४.

# स्वयंसेवकांचा अनुभव

३ वर्षांपूर्वी घरी येणाऱ्या दैनिक वृत्तपत्रातून नकळत एक जाहिरात हाती मिळाली. वृद्धांची सेवा आणि ती देखील मोफत. त्या अनोखी आणि आजवर न ऐकलेल्या संस्थेची अर्थात माया केअर फाउंडेशन ची जाहिरात वाचून खरंच आश्चर्याचा धक्का बसला.

सेवाभावी वृत्तीने समाजसेवा करण्याची आवड असणारा मी.. साहजिकच निष्काम , निस्वार्थी भावनेने वृद्धांची सेवा करणाऱ्या त्या संस्थेशी एकरूप होण्याचा मनोमन निर्णय घेतला. कोल्हापूर मधील माया केअर फाउंडेशन चे ज्येष्ठ स्वयंसेवक श्री.संजय कुलकर्णी आणि अभिषेक यादव यांच्याशी संवाद साधला. त्यांच्याकडून मिळालेली माहिती आणि मार्गदर्शन व प्रेरणेतून काही काळातच फाउंडेशनचा स्वयंसेवक म्हणून संस्थेचा एक घटक झालो.

गेल्या ३ वर्षात माया केअर फाउंडेशनचे कोऑर्डिनेटर श्री. अभिजीत माळी व माधुरी मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली वृद्धांची सेवा करण्याचा योग आला. संस्थेचे उद्दिष्ट आणि संस्थेची कार्यपद्धती, इतकंच नव्हे तर स्वयंसेवकांना वेळोवेळी निर्माण होणाऱ्या शंका आणि अडचणी याबाबत अभिजीत माळी व माधुरी मॅडम यांच्याकडून झालेले मार्गदर्शन मोलाचे होते.

कोल्हापूर पासून २५ किलोमीटरवर असणाऱ्या एका खेड्यात राहणारे वयोवृद्ध स्वातंत्र्य सैनिक यांची आझादी का अमृत महोत्सव या अंतर्गत घेण्यात आलेली मुलाखत खूपच प्रभावशाली ठरली. त्यानिमित्ताने संपूर्ण गावातून माया केअर फाउंडेशन या संस्थेला  निस्वार्थ सेवाभावी संस्था म्हणून गौरवण्यात आले. कोल्हापूर परिसरातील सर्वच वृद्धाश्रमांना भेट देऊन वेगवेगळ्या माध्यमातून ज्येष्ठांना आनंद देता आला. हे कार्य करत असताना इतरही स्वयंसेवकांचा सहभाग लाभला. तसेच नुकत्याच आपल्या फाउंडेशनच्या स्वयंसेविका गीत गायन आणि संगीताची जाण असलेल्या अश्विनी वाघरे मॅडम यांच्यासोबत सावली वृद्धाश्रमात सादर केलेला गीत गायनाचा बहारदार कार्यक्रम झाला. वृद्धांच्या चेहऱ्यावरील उत्साह आणि आनंद पाहून तेथील संचालकांनी माया केअरला आभार पत्र देऊन  फाउंडेशनचा गौरव केला.

उच्च विद्या विभूषित व्ही. डी. कुलकर्णी यांना मी दिलेल्या सेवेने प्रभावित होऊन त्यांनी आपल्या संस्थेचे इंग्रजी पत्रातून मानलेले आभार मला पुन्हा पुन्हा नवी ऊर्जा देणारे ठरतात. गेले १५ वर्षे अंथरुणावर असणारे इंजिनीयर कागले साहेब किंवा ज्यांच्या घरी माझ्याकडून श्री गणेशाचे आगमन आणि प्रतिष्ठापना केली ते रमाकांत कुलकर्णी वयोवृद्ध दांपत्य, बँकेची अनेक व्यवहार माझे कडून करून घेतलेल्या ९० वर्षाच्या लीलाताई कारंडे ,दवाखाना आणि वैद्यकीय उपचारावेळी मदत केलेले श्री बरकाळे अशा अनेक ज्येष्ठांना दिलेल्या सेवेनंतर त्यांच्या चेहऱ्यावरील फुलणाऱ्या समाधानाचे हास्य आणि त्यांचे आशीर्वाद हे मला समाजातील पुरस्कार मिळाल्याचा आनंद देत असतात.

भारतातील साधारण ७२ शहरांमधून आणि युनायटेड किंगडम मधील ४ शहरांमधून वृद्धांच्या सेवेचा वसा घेतलेल्या माया केअर फाउंडेशनच्या बॅनर खाली वृद्धांना सेवा देताना मला खूप खूप अभिमान वाटतो.

उंचावलेले आयुष्यमान ,प्रगत वैद्यकीय सेवा यामुळे संपूर्ण देशात आयुष्यमान वाढलेले साधारण १ कोटींच्या संख्येत असलेले वृद्ध आज दैनंदिन मदतीच्या गरजेसाठी प्रतीक्षेत आहेत. अशावेळी कोणतीही अपेक्षा न करता मानव सेवा हीच ईश्वर सेवा या उदात्त हेतूने कार्यरत असलेली माया केअर फाउंडेशन ही सेवाभावी संस्था ज्येष्ठांच्या वृद्धांचा आशेचा किरण ठरू पाहते त्याचे खूप खूप समाधान वाटते.

–श्री. विश्वास पांचाळ कोल्हापूर.



आमचे पुण्याचे लाभार्थी
श्री प्रशांत कानेटकर यांना
हॉस्पिटलमध्ये मदतीसाठी
घेऊन गेल्या असता
आमच्या स्वयंसेविका
शुभांगी लोहकरे मॅडम.



आमच्या मुंबईच्या लाभार्थी
सौ केतकी भागवत यांना
मोबाईल वापरण्यासाठी
मदत करत असताना
आमच्या स्वयंसेविका
सरिता पवार मॅडम



आमचे मुंबईचे स्वयंसेवक
मिलिंद पुरोहित हे माधव
देशमुख यांना बँक
कामासाठी मदत
करत असताना..



आमच्या मुंबईच्या लाभार्थी
इंदुबाई गमरे यांना त्यांच्या
बँक कामासाठी बँकेमध्ये
घेऊन गेले असताना
आमचे स्वयंसेवक
रोहिदास जाधव सर



आधार वृद्धाश्रम सोलापूर येथील ज्येष्ठांसोबत कॅरम खेळत असताना
आमच्या स्वयंसेविका सीता बनसोडे मॅडम.



आमचे सांगलीचे लाभार्थी कुमार कुलकर्णी यांना मेडिकल रिपोर्ट साठी
मदत करण्यासाठी गेले असताना आमचे स्वयंसेवक सचिन उपाध्ये.



आमचे नाशिकचे लाभार्थी
अरुण बेडसे यांना
हॉस्पिटलच्या मदतीसाठी
घेऊन गेले असताना
आमचे स्वयंसेवक
अतुल थोडगे सर



आमचे नागपूरचे लाभार्थी
तुकाराम तायडे यांना
वर्तमानपत्र वाचून दाखवत
असताना आमच्या
स्वयंसेविका
वैशाली तुपकर मॅडम.



आमच्या पुण्याच्या लाभार्थी सौ कुसुम कामत यांच्याशी सोबत करताना आमच्या स्वयंसेविका गौरी क्षीरसागर मॅडम.



आमच्या पुण्याच्या लाभार्थी रश्मी मालपेकर यांनी आमच्या संस्थेला दिलेल्या देणगीचा चेक स्वीकारताना आमच्या स्वयंसेविका माणिक वैशंपायन.



कोल्हापूरचे लाभार्थी विजय कागलकर यांना गणेश मूर्ती आणून देण्यासाठी मदत करत असताना आमचे स्वयंसेवक संजय कुलकर्णी.



मुंबईच्या लाभार्थी जयवंती दंताळ यांना हॉस्पिटलमध्ये घेऊन गेले असता आमच्या स्वयंसेविका सुजाता गावडे मॅडम.



आमच्या पुण्याच्या लाभार्थी तेजस्विनी गाडगीळ यांना बँक कामासाठी मदतीला गेल्या असता आमच्या स्वयंसेवका विनिता महाजन.




आमचे पुण्याचे स्वयंसेवक नंदू नारंग हे विद्याभवन हायस्कूल येथे ध्वजारोहण करत असताना.



आमचे पुण्याचे लाभार्थी विनायक गात यांना वाचन करून ऐकवत असताना आमच्या स्वयंसेविका विना जोग.




निवारा वृध्दाश्रमात श्रावणरंग संस्थेमार्फत मराठी, हिंदी गाणी सादर करताना

**Maya** CARE Foundation

The next best thing to family

भावनिक/बौद्धिक /औपचारिक समर्थनासाठी वरिष्ठ नागरिकांना
मोफत 90 मिनीटांच्या भेटी

**✻ सेवा ✻**

त्यांना डॉक्टर / रेडियोथेरेपी / लसीकरण / सामाजिक कार्यक्रम
थिएटर / बँक / कागदपत्रे / लेखन / वाचन / खरेदी /
गॅझेटस वापरुन / व्हिडिओ कॉल करण्यात मदत

# MAYA CARE NATIONAL HELPLINE : 1800 572 1343

| CITY | FOR WHATSAPP |
|---|---|
| मुंबई,पुणे,कोल्हापूर,सांगली,सातारा,सोलापूर,लातूर, नागपूर,नाशिक,परभणी,अहमदनगर,छ.संभाजीनगर,जालना,जळगाव,धुळे,अमरावती,वर्धा,अकोला,बुलढाणा,यवतमाळ, चंद्रपूर,बीड,नंदुरबार,बेंगलोर,हैदराबाद,चेन्नई,दिल्ली,सुरत,वडोदरा,अहमदाबाद,गांधीनगर,कच्छ,चंदीगड,जालंधर,लुधियाना,अबोहर,जबलपूर,उज्जैन,भोपाळ,छतरपुर,ग्वाल्हेर ,इंदोर,रीवा,झांसी,लखनऊ,कानपूर,कोइंबतूर,पाँडिचेरी,पानिपत,गुवाहाटी,हहलखंडी,भुवनेश्वर,अंगूल,संबलपूर,जयपुर,जोधपुर,उदयपूर,ढोलपूर,जैसलमेर,बराण,कोची, तिरुअनंतपुरम,कोलकत्ता,पूर्व मिदनापूर,पश्चिम मिदनापूर,हावडा,बांकुरा,मालदा,उत्तर २४ परगणा,हरिद्वार,डेहराडून, इंग्लंड-लंडन, केंब्रिज, मिल्टन केन्स, मँचेस्टर. | 9552510400<br>9552510411<br>8055995966 |

**Website - www.mayacare.org | Email : service@mayacare.org**

तुम्ही जेष्ठ नागरिक आहात आणि तुम्ही एकटे किंवा दुकटे राहात आहात किंवा जेष्ठ नागरिक आहात आणि कुटुंबात राहात आहात पण अपंग आहात तर आम्ही आपल्याला संपूर्णपणे मोफत मदत करू शकतो:

१) किराणा , भाजी , फळफळावळ औषधे आणून देणे .
२) डॉक्टरकडे , घेऊन जाणे आपण रुग्णालयात दाखल असल्यास आय सी यु च्या बाहेर थांबणे .
३) आपल्याला धार्मिक किंवा इतर पुस्तके, वृत्तपत्रे वगैरे वाचून दाखविणे, लेखन करणे .
४) आपल्या बँकेत जाऊन पैसे काढणे ,पैसे भरणे, चेक भरणे .मुदत ठेव नुतनीकरण करणे
५) आपल्याला एसटी स्टँड , रेल्वे स्टेशन , विमानतळ येथे पोंहचविणे किंवा तेथून घरी सुखरूप पोहचविणे .
६) मोबाईल फोन वापरणे , कॉम्प्युटर वापरणे इत्यादी साठी मदत करू .
७) या शिवाय इतर अनेक गोष्टीसाठी आम्ही तुम्हाला मदत करू.
८) दिनानाथ मंगेशकर हॉस्पिटल येथे विनामुल्य रुग्ण सेवा.

देणगीसाठी **QR Code**

माया केअर कोणतीही नर्सिंग आणि तातडीची सेवा देत नाही.

**✻ आपले अभिप्राय व सुचना यांचे स्वागत आहे. आपण ई-मेल करुन कळवू शकता.**

**देणगीसाठी आयकर सवलत आहे.**

**NAME OF THE A/C - MAYA CARE FOUNDATION**

**NAME OF THE BANK : ICICI BANK LIMITED** (BRANCH : TILAK ROAD,PUNE)
**ACCOUNT NO. : 187501000462**
**IFSC CODE : ICIC0001875**

**PRINTED MATTER**

बुक-पोस्ट

**FROM,**

**माया केअर फाऊंडेशन**
**1214 शुक्रवार पेठ, आफ्रिका हाऊस,**
**सुभाषनगर, गल्ली नं.04, पुणे - 411002.**

केवळ खाजगी वितरणासाठी / विनामूल्य

**Printed At - Sane & Shinde Associates**
**Tel.: 020-24477059**

**TO,**

श्री/श्रीमती ____________________